# ''कोल्हापूर जिल्ह्यातील महानगरपालिका आणि नगरपालिकेतील सफाई कामगारांच्या समस्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास''

**दिपाली तुकाराम सामंत**, संशोधिका, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

## प्रास्ताविक

भारतीय समाजव्यवस्थेचे जातीव्यवस्था एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. त्यामुळे प्राचीन काळापासून भारतीय समाजात जात नावाची गोष्ट आहे. जात आणि एक व्यवसाय असे एक सूत्र यामागे होते. शतकानुशतके माणसे जातीच्या चक्रामध्ये फिरत राहिली. या जातीच्या उतरंडीमध्ये समाजातील सर्वांत खालच्या स्तर अस्पृश्य लोकांचा आहे. या अस्पृश्य लोकांनी समाजातील सर्व घाणेरडी कामे करायची म्हणजेच रस्त्यांची झाडलोट करणे, मेलेली गुरेढोरे ओढणे, वरिष्ठ जाती सांगतील ती सर्व कामे करणे इ. यामधून व्यक्तीची जीवनपद्धती आणि सामाजिक संबंधाचे स्वरूप जातीनुसार कळते म्हणून जातीव्यवस्था भारतीय समाजरचनेचा पाया मानला जातो. एकूणच भारतामध्ये साफसफाईची कामे काही विशिष्ट जातीवर लादण्यात आलेली होती आणि आजदेखील काही विशिष्ट जाती साफसफाईची कामे करताना दिसून येतात. अशा व्यक्तींना सर्वसाधारण सफाई कामगार म्हणून संबोधले जाते.

सफाई कामगार हा वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात साफसफाईचे काम करताना निदर्शनास येतो. ज्याप्रमाणे परिसर स्वच्छ ठेवण्याची वैयक्तिक जबाबदारी असते, त्याप्रमाणे शहरे स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी तेथील स्थानिक स्वराज्य संस्थेतील आरोग्य विभागाकडे प्रामुख्याने असते. एकूणच शहराच्या विकासाची वाटचाल तेथील सफाई व्यवस्थेच्या विकासाशी अपरिहार्यपणे जोडली गेली आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेमधील सार्वजनिक आरोग्य सांभाळण्याचे कर्तव्य सफाई कामगारांना पार पाडावे लागते. आधुनिकतेचा प्रभाव भारतीय समाजावर पडला असला तरीदेखील या सफाई कामगारांना वर्षानुवर्षे त्यांचा चालत आलेला पारंपारिक व्यवसाय करावा लागतो. प्रस्तुत संशोधन सफाई कामगारांवर आहे.

## सफाई कामगारांची व्याख्या

१९९३ च्या कलम २ (१) च्या अनुसार सफाई कामगार म्हणजे जी व्यक्ती मैला साफ करण्यामध्ये गुंतलेली आहे तिला सफाई कामगार म्हटले गेले. परंतु ह्या व्याख्येत अगदी संकुचित अर्थ होता. राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळाने सन २००० मध्ये व्यापक दृष्टीकोनातून व्याख्या केलेली आहे. जी व्यक्ती रस्ता साफसफाई करणे, कचरा उठाव व त्याची विल्हेवाट लावणे, त्याचबरोबर इतर कामे जे समाजमान्य नाही. अशा प्रकारच्या कामामध्ये गुंतलेल्या व्यक्तींना सफाई कामगार म्हटले जाते.

कलम ४४ (क) सफाई कामगार याचा अर्थ रस्ते झाडण्यासाठी किंवा ते स्वच्छ करण्यासाठी किंवा केरकचरा वाहून नेण्यासाठी किंवा शौचकूप, मलप्रणाल, गटारे किंवा सार्वजनिक जागा स्वच्छ करण्यासाठी प्रत्यक्षात नोकरीवर ठेवलेला कर्मचारी वर्ग असा आहे.

## संशोधन समस्या

सफाई कामगार आजही दुर्बल, वंचित आहेत. त्यामुळे उपेक्षित असणाऱ्या घटकांवर स्वतंत्रपणे अभ्यास होण्याची गरज आहे. म्हणून कोल्हापूर जिल्ह्यातील नऊ नगरपालिका आणि एक महानगरपालिका यामधील सफाई कामगारांची सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक परिस्थितीचे अध्ययन करणे. त्याचबरोबर घाणीच्या साम्राज्यात काम करत असताना सफाई कामगारांच्या आरोग्यावर होणारा परिणाम आणि व्यावसायिक समस्या तसेच शासकीय योजनांची भूमिका अभ्यासणे ही अध्ययनाची संशोधन समस्या आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे

उद्दिष्ट्यांच्या निर्धारणाशिवाय संशोधन कार्य केले जाऊ शकत नाही. त्यामुळे प्रस्तुत अभ्यासासाठी निश्चित करण्यात आलेली उद्दिष्टे पुढीलप्रमाणे :

१) कोल्हापूर जिल्ह्यातील महानगरपालिका आणि नगरपालिका यामधील सफाई कामगारांच्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

२) कोल्हापूर जिल्ह्यातील महानगरपालिका आणि नगरपालिका यामधील सफाई कामगारांच्या कामाचे स्वरूप अभ्यासणे.

३) कोल्हापूर जिल्ह्यातील महानगरपालिका आणि नगरपालिका यामधील सफाई कामगारांच्या व्यवसायामधील समस्यांचा अभ्यास करणे.

४) सफाई कामगारांच्या संदर्भातील शासकीय योजनांची भूमिका अभ्यासणे.

**संशोधनाची गृहितके**

प्रस्तुत संशोधनाअंतर्गत पुढील तीन मुख्य गृहीतके प्रतिसादकांच्या दिलेल्या उत्तरांच्या आधारे तपासून पाहण्यात आली.

१) सफाई कामगारांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात व्यसनाधीनता असल्याने कर्जबाजारी आहेत.

२) सफाई कामगारांचे सध्याचे कामाचे स्वरूप जातीनिहाय वर्गीकृत केले जाते.

३) सफाई कामगारांच्या मध्ये निरक्षरतेचे प्रमाण अधिक असल्याने त्यांच्या संदर्भातील शासकीय योजनांच्या बाबत जागरूक नाहीत.

**संशोधन क्षेत्र**

प्रस्तुत अध्ययनासाठी महाराष्ट्रामधील कोल्हापूर जिल्ह्यातील नऊ नगरपालिका आणि एक महानगरपालिका यामधील सफाई कामगारांची संशोधन अभ्यासासाठी निवड केलेली आहे.

**संशोधन आराखडा**

प्रस्तुत संशोधनाचे स्वरूप अन्वेषणात्मक किंवा परिचयात्मक पातळीवर ठेवण्यात आले आहे. जेणेकरून संकलित केलेल्या अनुभवजन्य माहितीचे विश्लेषण करता येईल.

**उत्तरदात्यांच्या नमुन्यांची निवड**

लोकसंख्येच्या निकषावरून नगरपालिका व महानगरपालिकेचे वर्गीकरण अ, ब, क आणि ड मध्ये करण्यात आलेले आहे. नऊ नगरपालिकांपैकी इचलकरंजी नगरपालिकेचा समावेश 'अ' वर्गामध्ये होतो. जयसिंगपूर नगरपालिका 'ब' वर्गामध्ये येते. क वर्गामध्ये समावेश होणाऱ्या नगरपालिका अनुक्रमे कागल, गडहिंग्लज, पेठवडगाव, कुरूंदवाड, मलकापूर, मुरगूड आणि पन्हाळा या सात नगरपालिका आहेत. तसेच कोल्हापूर महानगरपालिकेचा समावेश 'ड' वर्गामध्ये होतो.

संशोधिकेजवळ उपलब्ध असणारी वेळ, पैसा आणि श्रम या स्वरूपातील साधनसामुग्री लक्षात घेऊन महानगरपालिका आणि नगरपालिका यामधील स्वच्छतेचे काम करणारा सफाई कामगार हा वेगवेगळ्या अ, ब, क आणि ड या वर्गांमध्ये विभागला गेला असल्याने सफाई कामगार उत्तरदात्यांची वीस टक्के याप्रमाणे संभाव्यता नमुना निवड पद्धतीमधील स्तरित यादृच्छिक पद्धतींचा वापर करण्यात आलेला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी अप्रमाणबद्ध स्तरित नमुना निवड पद्धतीने नगरपालिका अ, ब, क आणि महानगरपालिका 'ड' यामधून २०% याप्रमाणे उत्तरदात्यांची निवड करण्यात आलेली आहे. संशोधनाचे समग्र २७६० इतकी आहे. यामधून २०% म्हणजे ५५० उत्तरदात्यांची नमुना म्हणून निवड करण्यात आलेली आहे.

**तथ्य संकलनासाठी वापरलेले साधन**

संशोधनासाठी प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा वापर करण्यात आलेला आहे. प्राथमिक साधनांमध्ये प्रश्नावली आणि मुलाखत अनुसूचीचा नेहमीच वापर करणेत येतो. प्रस्तुत संशोधनामध्ये सफाई कामगार बहुतांशी अशिक्षित असल्याने प्रश्नावली ऐवजी संशोधिकेने मुलाखत अनुसूचीचा वापर करून तथ्य संकलन केलेले आहे.

**दुय्यम माहिती**

प्रस्तुत संशोधनाच्या बाबीसंबंधीची दुय्यम स्त्रोतांपैकी सफाई कामगारांच्या संदर्भात लिहिलेली आत्मचरित्रे, सामाजिक, सांस्कृतिक वर्णनपर पुस्तके, मासिके, जर्नल्स, वर्तमानपत्रे, अप्रकाशित एम. फिल, पीएच. डी. प्रबंध, इंटरनेटवरील लेख त्याचबरोबर पालिका यांची शासकीय कार्यालये, शैक्षणिक ग्रंथालये यांच्याकडून माहिती संकलित करण्यात आलेली आहे.

**सामाजिक आर्थिक पार्श्वभूमी**

सफाई कामगारांना पुढील मुद्यांच्या आधारे प्रश्न विचारले आणि त्यामधून दिसून आलेली ठळक निरीक्षणे पुढीलप्रमाणे आहेत.

सफाई कामगारांची सामाजिक पार्श्वभूमी नमुन्यांतील उत्तरदात्यांमध्ये ३६ ते ४६ या वयोगटातील सफाई कामगारांचे प्रमाण सर्वांत अधिक आहे. साफसफाई या व्यवसायामध्ये पुरूषापेक्षा स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे. बहुसंख्य स्त्रिया अशिक्षित आहेत.

**जात**

साफसफाई काम करण्यासाठी अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातीमधील लोक काम करताना निदर्शनास येतात. परंतु त्यांच्या कामामध्ये देखील भेदभाव आहे. कचरा साफसफाई करणारे झाडू कामगार महार, मांग, माकडवाला आणि इतर जातीतील आहेत. परंतु सार्वजनिक शौचालये, मुताऱ्या साफसफाई करणारे बाल्मिकी, लालबेगी शेखभंगी, मेहतर, मलकाना आणि काटेवाडी या जातीतील आहेत. इतर जातीतील लोकांचा प्रवेश या सफाई कामामध्ये झालेला असला तरी त्यांचे प्रमाण नगण्य आहे.

**वैवाहिक दर्जा**

विवाहित स्त्री–पुरूषांचे प्रमाण अधिक आहे पण साफसफाईच्या कामाच्या स्थितीमुळे कामगारांचे आयुर्मान कमी होऊन अकाली मृत्यू होतो. त्यामुळे विधवा होण्याचे प्रमाण देखील अधिक आहे.

**शैक्षणिक स्थिती**

प्रस्तुत अध्ययनामध्ये शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प आहे. अल्पशिक्षित व निरक्षरता यांचे प्रमाण अधिक आहे. या साफसफाईच्या व्यवसायामध्ये प्रवेश करण्यासाठी शिक्षणाची कोणत्याही प्रकारची अट नाही. केवळ वारसा हक्कानुसार नोकरी मिळत असल्याने शिक्षणाविषयी आस्था नाही.

**सफाई कामगारांच्या पाल्यांची शैक्षणिक स्थिती**

बहुसंख्य सफाई कामगारांनी आपण करत असलेल्या व्यवसायामुळे मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होत असल्याचे मत व्यक्त केले. काही सफाई कामगारांच्या पाल्यांनी गरीबी, अज्ञान, संगतीचा परिणाम किंवा नापास झाल्यावर शाळा सोडणे. तसेच या साफसफाईच्या कामामध्ये येण्यासाठी शिक्षणाची अट नाही, त्यामुळे शिकून फारसा काही उपयोग नाही अशी मानसिकता तयार झालेली असल्याने अर्धवट शिक्षण सोडलेले आहे. मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. मुलींचे शिक्षण जास्त झाले तर लग्नाकरिता वर शोधण्याची समस्या निर्माण होऊन शिक्षणात खंड पडण्याचे एक कारण बनते. एकूणच दुसऱ्या पिढीमध्ये शिक्षणाचा प्रसार झालेला आहे. प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक यामध्ये प्रगती दिसून येते. परंतु पदवीधर, पदव्युत्तर व इतर कोर्स यामध्ये सफाई कामगारांच्या पाल्यांचे शिक्षण घेण्याचे प्रमाण कमी आहे.

**स्थलांतर**

कोल्हापूर जिल्ह्यांमध्ये ज्या शहरांमध्ये नगरपालिका आणि महानगरपालिका आहेत. अशा शहराच्या ठिकाणी कामानिमित्त बहुतांशी सफाई कामगारांनी स्थलांतर केलेले आहे. लालबेगी, शेखभंगी, बाल्मिकी, मेहतर, मलकाना, काटेवाडी या जाती मूळच्या महाराष्ट्रातील नाहीत. त्या उत्तर प्रदेश, राजस्थान, गुजरात, पंजाब, दिल्ली या ठिकाणच्या स्थलांतरित आहेत.

**घर**

कोल्हापूर येथे शाहू महाराजांनी काही अस्पृश्य समाजाला जागा दिल्याने बहुसंख्य सफाई कामगारांची घरे स्वत:ची आहेत. बहुतांशी सफाई कामगारांच्या दोन खोल्या आहेत. वीज, स्नानगृह व शौचालय या मुलभूत सुविधा असणाऱ्यांचे प्रमाण कमी आहे. ज्यांच्या घरी शौचालये नाहीत अशी कुटूंबे सार्वजनिक शौचालयाचा वापर करतात.

राज्यातील महानगरपालिका किंवा नगरपालिकेत सफाई कामगार म्हणून २५ वर्षे सेवा पूर्ण केलेल्या किंवा सेवानिवृत्त झालेल्या किंवा सेवेत मृत्यू झालेल्या सफाई कामगारांच्या वारसाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर

श्रमसाफल्य योजनेअंतर्गत मोफत सदनिका दिल्या जातात. अशी तरतूद असताना देखील नमुना निवडीतील एकाही कामगाराला शासनाकडून मोफत सदनिका मिळालेली नाही ही वस्तुस्थिती आहे.

**धार्मिक वृत्ती**

सफाई कामगारांची देवावर श्रद्धा असणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. सफाई कामगार देवाला प्रसन्न करून आपल्या सुखी जीवनासाठी कोंबडे, बकरी, डुक्कर यांचा बळी देणे, पैशाच्या स्वरूपात दानधर्म करणे, उपवास करणे अशा स्वरूपात नवस पूर्ण करतात. त्याचबरोबर आपल्यावर उद्‌भवलेल्या आजाराचे संकट दूर करण्यासाठी दवाखान्याबरोबर भगत, मांत्रिक व ज्योतिष यांचा आधार घेतात. एकूणच आपल्या प्रत्येक कृतीमागे देवाची किंवा नशीबाची साथ जोडली जाते.

देवाला न मानणाऱ्यांचे प्रमाण कमी आहे हे सफाई कामगार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारानुसार अनुसरण करणारे आहेत.

**आर्थिक परिस्थिती**

प्रस्तुत अध्ययनामध्ये निम्मापेक्षा जास्त सफाई कामगारांनी कर्ज घेतल्याने निदर्शनास येते. धार्मिक प्रथा, विवाह, घर बांधण्यासाठी व व्यसने यासाठी कर्ज काढणाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. त्यांना असणारी व्यसने यामुळे आर्थिक स्थितीवर ताण येतो. त्याचबरोबर विविध बँका, पतसंस्था यामार्फत कर्ज मिळते. परंतु स्थानिक सावकारांकडून कर्ज घेणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. या सावकाराच्या जाळ्यांमध्ये सफाई कामगार अडकलेला आहे. एकूणच चतुर्थ श्रेणीतील सफाई कामगार हा बहुसंख्येने कर्जबाजारी असल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास येते. आपला दैनंदिन खर्च भागविण्यासाठी, अनपेक्षित प्रसंगाला तोंड देण्यासाठी, त्याचबरोबर त्यांना असणारी व्यसने यामुळे सफाई कामगारांचे जीवन हे कर्ज बाजाराच्या ओझ्याखाली चिरडत असल्याचे दिसून येते.

**व्यसनाधिनता**

व्यसनाधिनतेचे प्रमाण ८७.४५% आहे. धुम्रपान, मद्यपान व जुगार यासारखी व्यसने पुरूष सफाई कामगारांमध्ये अधिक आहेत तर काही स्त्रियांच्या मध्ये तंबाखू व पानसुपारीचे व्यसन आहे. व्यसन नसणाऱ्यांचे प्रमाण नगण्य आहे.

सफाई कामगारांच्या पाठीमागे नेहमी दोन ग्रहणे लागलेली असतात. एक म्हणजे कर्ज व दुसरे व्यसन होय.

**इतर उत्पन्नाचा मार्ग**

बहुतांशी ८४.४% सफाई कामगारांना साफसफाईची नोकरी सोडून इतर उत्पन्नाचा मार्ग नाही. सफाई कामगारांची शेती असणाऱ्यांचे प्रमाण ७.६% अत्यल्प आहे. काही सफाई कामगारांच्या कुटुंबातील सदस्यांनी किराणा माल दुकान, टेलरिंग, गिरण, चटणी डंग, पानपट्टी, ब्युटी पार्लर यासारखे छोटे मोठे व्यवसाय सुरू केलेले आहेत.

**सफाई कामगारांची कामाची परिस्थिती व समस्या**

**कामाचे स्वरूप**

बहुतांशी सफाई कामगार रस्ता साफसफाईचे काम करतात. रस्ता साफसफाई करण्याचे काम जास्तीत जास्त स्त्री वर्गाकडे असल्याचे निदर्शनास येते. सफाई कामगारांना सफाई कामगारांच्या कमतरतेमुळे अधिक परिसर स्वच्छ करावा लागतो. १४.१% उत्तरदाते शंभर ते पाचशे घरातील कचरा संकलित करण्याचे काम करतात. ९.६% उत्तरदात्यांनी दररोज तीस ते पस्तीस सीटसचे शौचालये साफ करावी लागतात.

**भूमिगत गटारांची साफसफाई**

७.१% उत्तरदाते भूमिगत गटाराची साफसफाई करण्याचे काम करतात. सर्वोच्च न्यायालयाने या कामावर बंदी आणलेली असली तरीदेखील सफाई कामगारांना आजही तुंबलेली गटारे साफ करण्यासाठी मॅनहोलमध्ये उतरावे लागते. भूमिगत गटारीमध्ये उतरण्यासाठी सफाई कामगारांना संरक्षक साधने पुरविली जात नाही. त्यामुळे नाल्यातील साप, बेडूक, कीटक व इतर सर्व घाण त्यांना सहन करावी लागते याची परिणती म्हणजे सफाई

कामगारांचा मृत्यू होतो.

**व्यवसायात येण्याचे कारण**

बहुतांशी सफाई कामगारांनी निरक्षरता, अल्पशिक्षण आणि वडिलोपार्जित आई-वडिलांच्या जागी वारसा हक्काने नोकरी मिळते त्यामुळे या व्यवसायाचा स्विकार केलेला आहे.

आपली हक्काची नोकरी म्हणून सफाई कामगारांच्या अनेक पिढ्या या व्यवसायात काम करताना निदर्शनास येतात. आपल्या इच्छेने या व्यवसायामध्ये आलेल्या उत्तरदात्यांचे प्रमाण सर्वाधिक ७७.७% आहे. घरातील हट्टापायी ज्यांनी हा व्यवसाय स्विकारलेला आहे तो तरूण वर्ग आहे.

एकूणच सफाई कामगारांचे सध्याचे काम आणि पारंपारिक जातीव्यवस्थेनुसार करणारे काम यामध्ये संबंध असल्याचे निदर्शनास येते. या साफसफाईच्या कामामध्ये आजदेखील काही विशिष्ट जातीतील व्यक्ती काम करताना दिसून येतात

**वेतन**

बहुतांशी उत्तरदात्यांच्या मते वेतन वेळेवर मिळत नसल्याने कर्ज काढावे लागते किंवा हातउसने पैसे घ्यावे लागतात. सफाई कामगारांचे वेतन चांगले व त्याची शाश्वती असली तरी त्यांच्या जीवनाचा उकिरडा झालेला आहे. कारण ते ज्या परिस्थितीमध्ये काम करतात त्या परिस्थितीमुळे व्यसनाधिनतेचे प्रमाण अधिक आहे. या व्यसनापायी सफाई कामगार कर्जबाजारी झालेले आहेत. त्यामुळे त्यांचा आर्थिक स्तर उंचावलेला दिसून येत नाही.

**पदोन्नती**

सफाई कामगारांच्या मते व्यवसायामध्ये पदोन्नती म्हणून मुकादम व क्लार्क पोस्ट मिळते. किमान शिक्षण १२ वी पर्यंत असेल तर क्लार्क पदोन्नती मिळते. परंतु सफाई कामगार आपल्या घरामधील मंडळीच्या भविष्याचा विचार करून पदोन्नती स्विकारत नाहीत. कारण लाड समितीच्या अहवालानुसार केवळ चतुर्थ श्रेणीतील सफाई कामगारांना वारसा हक्क लागू होतो. मुकादम पोस्टला वारसा हक्क लागू आहे. परंतु मुकादम पोस्टला शिक्षण किमान ७ वी पास असणे आवश्यक आहे. तसेच १० ते १५ वर्षांचा नोकरीमधील एक पर्व संपल्यानंतर मुकादमची पोस्ट मिळते.

पालिकेमध्ये महार, मांग या जातीतील सफाई कामगार मोठ्या संख्येने असल्याने नगरपालिका आणि महानगरपालिका यामध्ये त्यांचे वर्चस्व असल्याने मोठ्या प्रमाणावर या जातीतील मुकादम असल्याचे निदर्शनास येतात.

**शोषणविषयक स्थिती**

बहुतांशी सफाई कामगारांच्या मते कामाच्या ठिकाणी आर्थिक शोषण होते. नोकरीमध्ये प्रवेश करण्यासाठी किंवा कायमची नोकरी होण्यासाठी, बदली होण्यासाठी पैसे मोजावे लागतात. एकूणच सफाई कामगारांचे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून, स्वच्छता निरीक्षक सुपरवाईजर आणि कामगार संघटनेच्या नेत्यांकडून शोषण होत असल्याचे स्पष्ट होते.

**संरक्षक साधनांचा वापर**

सफाई कामगार कामाच्या ठिकाणी कोणत्याही संरक्षक साधनांचा वापर करीत नाहीत. नगरपालिका आणि महानगरपालिका यांच्यामार्फत कोणत्याही स्वरूपाच्या संरक्षक साधनांचा पुरवठा केला जात नाही. त्यामुळे सफाई कामगार या संरक्षक साधनांचा वापर करण्याकडे दुर्लक्ष करतात.

**सामाजिक सुरक्षा**

६१.१% सफाई कामगारांना निवृत्तीनंतर पेन्शन योजना आहे. बहुतांशी सफाई कामगारांच्या मते वैद्यकीय वेतन रजा आहेत परंतु रजा मिळत नाही. तसेच पाहिजे तेव्हा सुट्टया मिळत नाहीत. स्वत: वैयक्तिक एल. आय. सी. मार्फत विमा काढणाऱ्यांचे प्रमाण ६३.२% आहे. कामगार अपघातामध्ये विकलांग झाला किंवा त्याचा मृत्यू झाला तर त्यांच्या कुटुंबाला आर्थिक आधार मिळण्यासाठी नगरपालिका आणि महानगरपालिका

यांच्यामार्फत सफाई कामगारांच्या सुरक्षिततेसाठी कोणत्याही प्रकारची विमा योजना नाही.

**कामगारांच्या समस्या**

बहुतांशी उत्तरदाते सध्याच्या कामाबद्दल असमाधानी असल्याचे निदर्शनास येते. नगरपालिकांमध्ये कंत्राटीकरण पद्धत आहे. या खाजगी कंत्राटदारांना स्वच्छतेचे कामे दिल्याने मानवी अधिकारांचे उल्लंघन होऊन एकाच प्रकारचे काम करणाऱ्या कामगारांना कमी वेतन, नोकरीची शाश्वती नाही, शारिरीक कष्टाची कामे मोठ्या प्रमाणात करावी लागतात. एकूणच कंत्राटी करणामुळे कामगारांच्या शोषणात वाढ झालेली आहे.

**आरोग्य स्थिती**

सर्वाधिक ८२.००% उत्तरदात्यांच्या सांगण्यावरून त्यांची आरोग्य तपासणी होत नसल्याचे दिसून येते. सफाई कामगारांचे काम शारिरीक कष्टाचे असल्याने कंबरदुखी, पाठदुखीचा त्रास होताना दिसून येतो. त्याचबरोबर घाणीच्या साम्राज्यात काम करत असल्याने दमा, त्वचेचे रोग, श्वसनाचा त्रास, डोळ्यांचा त्रास, धूळ, दुर्गंध यामुळे डोकेदुखीचा त्रास, मधुमेह, हातापायांना जखमा होणे, अर्धांगवायू यासारख्या आजारांनी सफाई कामगारांना जखडले आहे. सुरक्षताविषयक साधने मिळत नसल्याने काचा, खिळे, दाढीच्या ब्लेडचे तुकडे, सिरिज, सडलेल्या पत्र्याचे तुकडे यामुळे धुर्नवात यासारखे आजार होतात. तसेच दुर्दैवाने सफाई कामगार कळत-नकळत हे आजार आपल्या कुटुंबापर्यंत घेऊन जातात.

**व्यवसायातील स्पर्धा**

बहुतांशी उत्तरदात्यांच्या मते इतर जातीतील लोकांचा सरकारी नोकरी मिळविण्याच्या लोभापायी हळूहळू प्रवेश होऊ लागला आहे. त्यामुळे त्यांच्याशी स्पर्धा निर्माण झालेली आहे.

**शासकीय योजना**

बहुतांशी सफाई कामगारांना शासनाच्या योजना कोणत्याही स्वरूपाच्या माहित नसल्याचे निदर्शनास आले. योजनेचा लाभ घेतलेल्या उत्तरदात्यांचे प्रमाण १७.९% फार कमी आहे. केंद्र व राज्य सरकार यांच्यामार्फत सफाई कामगारांसाठी अनेक योजना राबविल्या जातात. पण त्या सफाई कामगारांच्यापर्यंत पोहचत नाहीत किंवा त्यांना योजनांची सविस्तर माहिती दिली जात नाही. एकूणच अंमलबजावणी करण्यासाठी अधिकार वर्गाची उदासिनता दिसून येते.

**व्यवसाय बदलण्याची संधी**

बहुतांशी सफाई कामगार व्यवसाय बदलण्यास तयार नसल्याचे दिसून येतात. नवीन ज्ञान, कौशल्य आणि शिक्षणाचा अभाव असल्याने दुसऱ्या व्यवसायाचा विचार करीत नाहीत. वाढत्या बेरोजगारीमुळे या व्यवसायाकडे हक्काची नोकरी आणि नोकरीची सुरक्षा व शाश्वती म्हणून पाहतात.

**सामाजिक दर्जा**

बहुतांशी ७२.१८% सफाई कामगारांच्या मते साफसफाईचे काम करीत असल्याने सामाजिक दर्जा सुधारलेला नाही. अस्वच्छ कामगार म्हणूनच पाहिले जाते. या कामामुळे समाजामध्ये एक वेगळी ओळख निर्माण झालेली आहे. समाजामध्ये सफाई कामगार आणि विशिष्ट जाती असे समीकरण तयार झालेले आहे.

एकूणच जात आणि व्यवसाय यांचे अतूट नाते असल्याने आज देखील आपण वर्गावर आधारित स्तर रचनेकडे वाटचाल करीत असताना देखील सफाई कामगार सामाजिक वंचिततेला सामोरे जात आहेत.

**शिफारशी**

१) सहज मिळणारी नोकरी टाकून शिक्षणाचा लांबचा पण प्रतिष्ठेचा मार्ग पत्करणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी व्यापक प्रमाणात शैक्षणिक सवलती देणे आवश्यक आहे.

२) सफाई कामगारांच्या पाल्यांच्या उच्च शिक्षणासाठी आणि व्यावसायिक शिक्षणासाठी राष्ट्रीयकृत बँकेकडून बिनव्याजी दीर्घमुदतीचे कर्ज पुरवठा करणे आवश्यक आहे. जेणेकरून उच्च शिक्षणाविषयी गोडी निर्माण होईल.

३) घाणीच्या साम्राज्यामध्ये सफाई कामगार काम करीत असल्याने त्यांचे संरक्षण करण्यासाठी पालिकेने

चांगल्या प्रतीची मुलभूत संरक्षक साधने पुरविणे आवश्यक आहे.

४) मुलभूत संरक्षक साधनांचा वापर करणे का आवश्यक आहे यासाठी पालिकेने प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

५) पालिकेमधून सफाई कामगारांची वेळच्या वेळी योग्य आरोग्य तपासणी होणे बंधनकारक आहे.

६) घरांचा प्रश्न त्याच्या सर्व अंगाशी जोडला गेला असल्याने घराचे नोकरीशी असणारे नाते तोडून टाकावे. त्याचबरोबर सफाई कामगारांना मालकी हक्कासह मोफत सदनिका देण्याची व्यवस्था करावी.

७) व्यसनाधिनतेचा आपल्या आरोग्यावर दुष्परिणाम कसा होतो हे पटवून देण्यासाठी चर्चा, शिबिरे व कार्यशाळा स्थानिक स्वराज्य संस्थेने व इतर स्वयंसेवी संघटना यांनी आयोजित करणे आवश्यक आहे.

८) जगण्याच साधन कितीही गलिच्छ असले तरी त्याला पर्याय दिल्याशिवाय त्याचा त्याग होणार नाही. यासाठी व्यवसाय बदलण्यासाठी उपयुक्त शिक्षण द्यायला हवे.

९) अनुसूचित जातींसाठी असणाऱ्या विविध शासकीय योजनांचे फलक पालिका कार्यालयामध्ये असणे आवश्यक आहे. तसेच सफाई कामगार ज्या वस्तीमध्ये राहतात त्या ठिकाणी विविध शासकीय योजनेसंदर्भात माहिती देणारे कार्यालय असणे आवश्यक आहे. जेणेकरून माहिती त्यांच्यापर्यंत पोहचू शकेल.

१०) समाजात प्रत्येक व्यवसाय महत्त्वाचा आहे त्यामुळे प्रत्येक व्यवसायाला सारखेच महत्व प्राप्त होण्यासाठी सामाजिक प्रबोधनाची गरज आहे. त्याचबरोबर सामाजिक भेदभावाची दरी कमी करून सफाई कामगारांच्याकडे समाजाचा बघण्याचा दृष्टीकोन बदलला पाहिजे.

**संदर्भ सूची**

१) खुदशाह संजीव (२६ जाने २००९), 'सफाई कामगार समुदाय', सुगावा प्रकाशन, पुणे.

२) वाल्मिकी ओमप्रकाश (२०११), 'सफाई देवता', सायन पब्लिकेशन्स, नारायण पेठ, पुणे.

३) दास भगवान (१९९८), 'वाल्मिकी जयंती और भंगी जातीयाँ' गौतम बुक सेन्टर, दिल्ली.

४) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम (१९६५), प्रकाशन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

५) नाडगोंडे गुरूनाथ (१९८६), 'सामाजिक संशोधन पद्धती', फडके प्रकाशन, कोल्हापूर.

www.coutercurrent.org.artical